# बृहन्मुंबई महानगरपालिका

## कार्यकारी अभियंता (परिवहन) पा.पु.म.नि. खाते

.............................................................................................................

**क्र. का.अ.(परि.)/ 6832 / पा.पु.म.नि. दिनांक 26.12.2016**

## <u>सूचना / परिपत्रक</u>

कार्यकारी अभियंता (परिवहन) पा.पु.म.नि. कार्यालयाच्या आस्थापनेवरील वाहनचालक संवर्गातील रिक्त पदे निवडीने भरण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व खाते / विभागातील निम्न संवर्गातील पात्र व इच्छुक कर्मचा-यांकडून सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यानुसार अर्ज मागविण्यात येत आहेत.

(1) उमेदवारांनी सर्व आवश्यक प्रमाणपत्रांच्या छायांकीत व सांक्षाकीत प्रतींसह आपले अर्ज मराठीत सुवाच्च स्वहस्ताक्षरांत लिहून यानगृह प्रमुखांमार्फत व सेवा अभिलेखाद्वारे अर्जातील माहिती पडताळून **कार्यकारी अभियंता (परिवहन) पा.पु.म.नि. , 2 रा मजला , मलनि:सारण प्रचालन इमारत , दादर उदंचन केंद्र संकुल , 249 , सेनापती बापट मार्ग , दादर (पश्चिम) मुंबई क्रमांक 400028** यांच्या कार्यालयात दिनांक 27.12.2016 पासून दिनांक 09.02.2017 पर्यंत (कार्यालयीन वेळेत पोहोचतील याची खबरदारी घ्यावी. सदर कालावधीपूर्वी वा नंतर प्राप्त झालेले अर्ज , अपूर्ण अर्ज , उमेदवारांनी सही न केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

(2) पदांचा तपशील :

| | | |
|---|---|---|
| 1 | पदाचे नाव | वाहनचालक |
| 2 | वेतनश्रेणी | रु. 5200 - रु. 20200 + GRP रु. 1950/- |
| 3 | रिक्त पदांची संख्या | 133 |

(3) कप्पीकृत आरक्षण पुढीलप्रमाणे आहे.

| कप्पीकृत आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | एकूण मागास वर्गीय | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | 09 | 02 | 08 | 04 | 01 | 02 | 01 | 21 | 48 | 46 | 94 |
| 30 % महिलांकराता | 04 | 01 | 03 | 02 | -- | 01 | -- | 09 | 20 | 19 | 39 |
| एकूण | 13 | 3 | 11 | 06 | 01 | 03 | 01 | 30 | 68 | 65 | 133 |
| 3% अपंग आरक्षण | एकूण 361 पदांमध्ये नि:समर्थ असलेल्या व्यक्तींकरीता आरक्षणानुसार 11 पदे आरक्षित होत असून अपंग प्रवर्गाची पद निश्चिती न झाल्याने सदर पदे प्रशासकीय निर्णयासापेक्ष रिक्त ठेवण्यात येणार आहेत. | | | | | | | | | | |

(4) (अ) आरक्षण / अनुशेष यात बदल होण्याची शक्यता आहे.

(ब) वि.जा.(अ) , भ.ज.(ब) , भ.ज.(क) , भ.ज.(ड) या प्रवर्गातील विहीत आरक्षण त्या त्या प्रवर्गातील कर्मचारी उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवर्तनीय राहील.

(क) मागासवर्गीय उमेदवारांनी त्या त्या जातीचे जात व जातवैधता प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. जातवैधता प्रमाणपत्र अर्ज करण्याच्या वेळी नसल्यास , उमेदवाराची निवड झाल्यास नेमणूकीच्या दिनांकापासून 06 महिन्याच्या आत जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

(ड) उमेदवारांनी सर्व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकीत व सांक्षांकीत प्रती ( शाळेचा दाखला , मागासवर्गीय असल्यास जात व जातवैधता प्रमाणपत्र , जड वाहनचालक परवाना , प्रपत्र ब , गोपनीय अहवाल इत्यादी ) अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच व्यवसाय चाचणीच्या वेळी मूळ प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक असेल याची नोंद घ्यावी.

(5) अर्हता : निवडीने

**1) उमेदवार इयत्ता 7 वी उत्तीर्ण असावा.**

**2) उमेदवाराजवळ प्रादेशिक परिवहन सेवा (RTO) या संस्थेचा जड वाहन चालविण्याचा कमीत कमी 1 वर्षापूर्वीचा वैध परवाना असणे आवश्यक आहे.**

**3) उमेदवारास मराठी लिहीता , वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.**

**4) उमेदवारास हिंदी , इंग्रजीचे ज्ञान असणे आवश्यक आहे.**

**5) मुंबई शहरातील रस्त्यांची माहिती असावी व वाहनाचे टायर्स व फॅनबेल्टस इत्यादी बदलता येणे आवश्यक आहे.**

**6) वाहनाचे लॉगशीट भरता येणे आवयश्यक आहे.**

**टिप : उमेदवारास खात्यांतर्गत घेण्यात येणा-या व्यवसाय चाचणीत (Driving test) व मुलाखतीत उतीर्ण होणे आवश्यक आहे.**

(6) सर्व आवश्यक प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती व्यवसाय चाचणी घेतेवेळी सादर करणे अत्यावश्यक आहे, अन्यथा उमेदवार व्यवसाय चाचणीकरिता पात्र समजला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

(7) उमेदवारांना व्यवसाय चाचणीसाठी स्वखर्चाने हजर राहावे लागेल.

(8) व्यवसाय चाचणीची वेळ , दिनांक व स्थळ हे नंतर जाहीर करण्यात येईल.

(9) निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती प्रथमत: दोन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी करण्यात येईल व त्यांची नियुक्ती चालू ठेवणे हे त्यांच्या दोन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीतील कामाच्या दर्जावर तसेच वर्तणूक व हजेरी यावर अवलंबून असेल.

(10) निवड झालेल्या उमेदवाराच्या नेमणूकीनंतर जर काही प्रशासकीय अडचण निर्माण झाल्यास त्यांना काहीही कारण न देता त्वरीत त्यांच्या पूर्व पदावर पाठवून देण्यात येईल.

Sd/-

(श्री. सुरेंद्र किशोर तिखे)

**कार्यकारी अभियंता (परिवहन) पा.पु.म.नि.**

<u>सर्व / खाते विभाग कार्यालये</u>

# बृहन्मुंबई महानगरपालिका

**(अर्जाचा नमुना)**

**सर्व खाते /विभागातील कर्मचा-यांसाठी**

| |
|---|
| सध्याचा पासपोर्ट आकाराचा फोटो |

**प्रति ,**

......................................................................

......................................................................

कार्यकारी अभियंता (परिवहन) पा.पु.म.नि. या खात्यामध्ये वाहनचालक पदाकरिता दिनांक ...../...../............. च्या भरती सूचना / परिपत्रक क्र. का.अ.(परि.) / ........... / पा.पु.म.नि. अन्वये मी खालील सही करणार विनंती अर्ज सादर करीत आहे.

माझी सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

1) संपूर्ण नाव (आडनावाने सुरुवात करुन) : ---------------------------------------------

2) कर्मचारी संकेतांक : ---------------------------------------------

3) जन्मतारीख : ----/----/------------

4) (अ) सध्याचा पत्ता : ---------------------------------------------

---------------------------------------------

---------------------------------------------

(ब) गावचा पत्ता : ---------------------------------------------

---------------------------------------------

---------------------------------------------

5) शैक्षणिक अर्हता : ------- वी उत्तीर्ण

6) अनुभव (असल्यास) : ---------------------------------------------

---------------------------------------------

7) जडवाहनचालक वैध परवाना क्र. : -------------------- दिनांक ---/---/------

8) अखंडीत सेवेचा दिनांक : ----/----/---------- पद -----------------

नियुक्तीचा जात प्रवर्ग : ---------------------------

सध्याचे पद --------------------------- दिनांक --------------------- पासून

सध्याचे वेतन ------------------------ व वेतनश्रेणी ----------------------------------------

एकूण सेवाकालावधी --------------------------------

(सोबत वेतन पावतीची छायांकीत प्रत जोडावी.)

9) उमेदवार मागासवर्गीय आहे काय ? ------------------------------------------------------

(असल्यास तपशील व प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत जोडावी.)

उमेदवार मागासवर्गीय असल्यास पुढील पदोन्नतीसाठी

आरक्षणाचा फायदा घेतला आहे काय ? ( होय / नाही )

10) (अ) उमेदवारास पूर्वी खात्यांतर्गत / न्यायालयीन शिक्षा झाली आहे का ? (होय / नाही)

(ब) झाली असल्यास शिक्षेचा तपशील नमूद करण्यात यावा व सदर निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडावी.

11) (अ) उमेदवाराची खात्यांतर्गत / न्यायालयीन चौकशी प्रलंबित वा प्रस्तावित आहे का ?

(होय / नाही)

(ब) असल्यास , त्याबाबत तपशील द्यावा. ----------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------.

मी या अन्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो / करते की , वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे . त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्याने माझा अर्ज फेटाळून लावल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही.

आपला/आपली विश्वासू

अर्जदाराची सही ..........................................

(नाव : -------------------------------------------- )

सोबत : प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रतिलिपी

1. ..........................................................	2. ..........................................................

3. ..........................................................	4. ..........................................................

5. ..........................................................	6. ..........................................................

कर्मचा-याच्या सेवा अभिलेखावरुन उपरोक्त माहिती पडताळलेली आहे.

**प्रशासकीय अधिकारी / खाते प्रमुख**

**<u>कार्यकारी अभियंता (परिवहन) पा.पु.म.नि.</u>**